
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय अठरावा , भाग पाचवा

## सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय अठरावा : भाग पाचवा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

जसा म्हाताऱ्याही कावळ्यास। न घालावा आहुतीचा घास। तैसे न सांगावी अभक्तास। गीता अर्जुना ॥१४८८॥
करे जो साधन। आणि आवडे तया पूजन। पण नसता मोक्षाचे आकर्षण। न सांगावी गीता ॥१४८९॥
जरी मागील दोही अंगी। उत्तम होय कीर जगी। परि तो गीताश्रवणालागी। पात्र नाही ॥१४९०॥
मोती अप्रतिम असे। परि जर छिद्र त्या नसे। मग दोऱ्यात ओवावे कैसे। तया अर्जुना ॥१४९१॥
सागर विशाल असे। कोणालाच अमान्य नसे। परि वायाच जात असे। पाऊस तेथे ॥१४९२॥
भूक नसलेल्या का वाढावे। आर्तास का न द्यावे। वाया का घालवावे। अन्न अर्जुना ॥१४९३॥
एऱ्हवी चांगला भासे। परि मोक्षदानी रस नसे। न सांगावे गीते जैसे। ज्ञान तया ॥१४९४॥
पाहण्याची ती ताकद। नयनी आहे अगाध। पण सुगंधाचा आस्वाद। नाही तेथे ॥१४९५॥
म्हणोनी तपी भक्ती। पहावे ते सुभद्रापती। आणि शास्त्रश्रवणाची प्रवृत्ति। असावी तेथे ॥१४९६॥
ऐसी तप आणि भक्ती। अर्जुना शास्त्रश्रवणी प्रवृत्ति। हे गुण जेथे आढळती। पात्र तो ॥१४९७॥
ब्रह्ममयतेच्या ठायी। जया आस्था जराशी नाही। न सांगावी गीता जराही। तयाला अर्जुना ॥१४९८॥
नाही आत्मज्ञानाची तहान। जया न आवडे मोक्ष पावणं। तयासी हे गीताज्ञान। न सांगावे कधी ॥१४९९॥
स्थिती अर्जुना तयांची। नाही काहीच कामाची। ज्योतीवीण त्या दिव्याची। कथा जैसी ॥१५००॥
अंग गोरे आणि तरुणे। वरी घातले ते दागिने। परि ऐकलेनि प्राणे। सांडिले जेवि ॥१५०१॥
सोन्याने बा सुंदर। सजवले आहे घर। पण नागाने द्वार। अडविले जैसे ॥१५०२॥
अन्न सुग्रास आणि चोखट। परि त्यात जर काळकुट। जैसे मैत्रीमाजी कपट। घातकी अर्जुना ॥१५०३॥
तैसी तपभक्ती मेधा। तयाची जाण प्रबुद्धा। जो माझी वा भक्तांची निंदा। करतसे अर्जुना ॥१५०४॥
याकारणे धनंजया। भक्त जरी मेघावी तपिया। तरी स्पर्श गीतेस या। नकोच त्याचा ॥१५०५॥
जो मोक्षाची निंदा करेन। जरी ब्रह्मदेवासम प्रज्ञावान। तरी तया गीताज्ञान। न द्यावे कधी ॥१५०६॥
जयाचा तप पाया मजबूत। आणि वरी गुरुभक्तीचा प्रसाद। तयासी ज्ञान हे देत। जावे अर्जुना ॥१५०७॥
जया आवडे श्रवण। तयासीच सांगावे हे ज्ञान। निंदकापासून दूर राहणं। कल्याण दायी ॥१५०८॥
अंगी जया ऐसे गुण। तयाने करता गीता श्रवण। मग मजसी एकरूप होणं। घडे तेथे ॥१५०९॥
ते एकाक्षरपण। जे त्रिमात्रेचे ठिकाण। ते पडले होते कोंडून। गर्भात जैसे ॥१५१०॥
जे गीतेच्या निमित्तानं। वेदबीज गेले विस्तारून। तेच गायत्रीचे अवतरण। अर्जुना माझ्या ॥१५११॥
त्या मोक्षास ही गीता। मेळवी माझीया भक्तां। देई नवजीवन माता। बालका जैसी ॥१५१२॥
तैसा भक्ता गीतेसी। भेटी घाली जो आदरेसी। तो देहापाठी मजसी। एकचि होय ॥१५१३॥
आणि जरी देहाचे लेणे। राहे लेऊनी वेगळेपणे। तरी मजसी तो आवडणे। अर्जुना बहू ॥१५१४॥
ज्ञानिया कर्मठा तापसा। या खुणेचिया माणसा। तो एकचि गा जैसा। आवडे मज ॥१५१५॥
तैसे भूतळी आघवा। काहीच न देखे पांडवा। सर्वत्र गातसे गोडवा। गीतेचा अर्जुना ॥१५१६॥
ब्रह्ममयता इच्छून। जो करी गीतेचे वाचन। तेच फैलावणे संतवचन। जगामाजी ॥१५१७॥
नवपालवीने रोमांचित। मंद झुळके डोलतं। सुवासा ते पसरवतं। फूल जैसे ॥१५१८॥
कोकिळेच्या त्या मिषे। वसंत जैसा प्रवेशे। मी तैसा भक्तिवशे। पावतो अर्जुना ॥१५१९॥
जैसे चंद्र तो उगवता। होई चकोर जन्माची सफलता। वा मेघ येऊन ठाकता। नाचे मोर ॥१५२०॥
माझीया प्राप्तीच्या कारणे। जयाने गीता ज्ञान सांगणे। जीवभावे तो आवडणे। अर्जुना मला ॥१५२१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तयाच्या त्या भक्तिकारण। तो मजला प्रिय असणं। नाही कोणी तयासमान। दुसरा अर्जुना ॥१५२२॥
जयाचा शुद्ध आचार। आणि करी गीतेचा प्रचार। मी तयाच्या जिभेवर। राहतो सदा ॥१५२३॥
माझीया तुझीया भेटीत। विस्तारली गीता संवादात। मोक्षज्ञान ते शब्दात। प्रकटले येथे ॥१५२४॥
सकळ ज्ञानाचे ज्ञान। प्रकटले गीतेच्या रूपानं। निष्काम ते होणं। सूत्र आहे ॥१५२५॥
निष्काम जो झाला। माया अविद्येतून सुटला। मजसी येऊन मिळाला। अर्जुना तो ॥१५२६॥
गीतेचे करून श्रवण। निष्काम होता मन। मग मोक्षाचे प्रकटन। दूर कैचे ॥१५२७॥
गीता पाठका ऐसे। फळ लाभते ज्ञानासरीसे। कोणी लहान-मोठे नसे। गीतेच्या ठायी ॥१५२८॥
निंदा ती सोडून। अर्जुना शुद्ध आस्थेनं। करता गीता श्रवण। लाभते ज्ञान ॥१५२९॥
साधकाच्या श्रवणपुटी। होता गीतेची पैठी। पापाची ती दाटी। विरुनि जाये ॥१५३०॥
जेव्हा त्या अरण्यात। अग्नी असे लागत। प्राणी दाही दिशा पळतात। तैसे अर्जुना ॥१५३१॥
जशी सूर्याची होता उगवण। अंधार तो लोप पावणं। तैसे ज्ञानाचे प्रकटन। ऐकता गीता ॥१५३२॥
तैसे कानाच्या महाद्वारी। होता गीतेची उजरी। पापाची ती गठरी। उरेचिना ॥१५३३॥
ऐसी ज्ञानवेली भन्नाट। होय पुण्यरूप चोखट। लागे मोक्षफळ अचाट। तियेला अर्जुना ॥१५३४॥
या गीतेची अक्षरे। शिरती जितकी कर्णद्वारे। तितके होतात पुरे। यज्ञ अश्वमेध ॥१५३५॥
म्हणून श्रवणे पापे जाती। आणि धर्म धरी उन्नती। मग स्वर्गराजसंपत्ती। लाभे तेथे ॥१५३६॥
स्वर्गसुख ते भोगणे। पाठी वैराग्याचे दाटणे। मग मजसी येऊन मिळणे। घडे अर्जुना ॥१५३७॥
गीता ऐकता वाचता। प्रकटे मोक्षाची प्राप्तता। मोक्षप्राप्तीची ती विलक्षणता। गीतेठायी ॥१५३८॥
हे ज्ञानाचे बा ज्ञान। ऐकलेस तू विस्तारानं। झाले कां समाधान। अर्जुना तुझे ॥१५३९॥
अर्जुना ऐकलेस तू ज्ञान। जे सांगितलं मी समजावून। झाले का ते ग्रहण। अर्जुना माझ्या ॥१५४०॥
आम्ही जैसे जया रीती। समजावले कानांच्या हाती। ते तैसे तुझ्या चित्ती। बसले का अर्जुना ॥१५४१॥
का गेले मधेच सांडून। अथवा अर्जुना विखरून। वा घडलंच नाही ऐकणं। अर्जुना तुझं ॥१५४२॥
जैसे आम्ही सांगितले। तैसीच हृदयी फावले। जर मी काही विचारले। तर सांगशील कां ॥१५४३॥
अज्ञानाच्या त्या कारण। गेला होतास मोहून। अर्जुना तो मोह संपून। गेला की नाही ॥१५४४॥
जो धर्म अर्जुना साचा। होणे खुलासा आत्मतत्त्वाचा। सिद्धांत तो कर्माचा। उमजला का तुज ॥१५४५॥
न व्हावा आत्मानंदी विलीन। म्हणून देवाने विचारला प्रश्न। आणि द्वैताचे ते भान। आणले अर्जुना ॥१५४६॥
पूर्णब्रह्म झाला पार्थ। तरी पुढे साधावया कार्यार्थ। तेथे सरसावला कृष्णनाथ। पुढती पुन्हा ॥१५४७॥
एऱ्हवी आपले करणे। सर्वज्ञ काय तो नेणे। परि केले पुसणे। याचिलागी ॥१५४८॥
जे विरले होते अर्जुनपण। पुन्हा आणले विचारून प्रश्न। आणि त्या पूर्ण स्थितीतून। बोलाया लावले ॥१५४९॥
जसे निघालेला समुद्रातूनी। चंद्र वेगळा दिसे गगनी। तैसे वेगळा तरी एकरूप होऊनी। बोलला अर्जुन ॥१५५०॥
तैसा ब्रह्म मी हे विसरे। तेथ जगचि ब्रह्मत्वे भरे। हेही सांडी तरी विरे। ब्रह्मपणही ॥१५५१॥
ऐसे ब्रह्मपण सोडत। तो आला देहाच्या सीमेत। मग बा अर्जुन होत। बोलू लागला ॥१५५२॥
मग थरथर ते कापत। नि रोमांच ते दावत। आणि घामबिंदू पुसत। आढळला तेथे ॥१५५३॥
श्वास होता बिघडला। देत स्वत:चा आधार स्वत:ला। स्तब्ध होऊन गेला। विसरून सारे ॥१५५४॥
आनंदाश्रू होते पाझरत। जे मावत नव्हते डोळ्यात। त्यासी प्रयत्न करत। आवरले त्याने ॥१५५५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

औत्सुक्य भरले दाट । नि भरून आला कंठ । त्या सर्वांना बा हृदयात । दाबले त्याने ॥१५५६॥
वाचा होती विस्कळित । ती सावरली प्रयत्न करत । श्वासोच्छ्वास व्यवस्थित । केला त्याने ॥१५५७॥

अर्जुन उवाच

देवा भरला अज्ञानाचा घाव । आणि संपला माझा मोह । सांडला असे बा ठाव । तयाने माझा ॥१५५८॥
जवळी येऊन सूर्याने । अंधार गेला का पुसणे । ऐसे कधी का घडणे । देवा माझ्या ॥१५५९॥
समीप असता श्रीकृष्ण । दिसते का बा डोळ्यानं । ऐसे ते का विचारणं । घडे कधी ॥१५६०॥
जे करण्याने नाही होत प्राप्त । तेच तोंडभरून असे सांगत । देवा तुझी बा रीत । अलौकिक की ॥१५६१॥
आता मोह असे की नाही । हे ऐसे जे पुससी काई । कृतकृत्य जाहलो पाही । तुझीया कारणे ॥१५६२॥
गुंतलो होतो अर्जुन गुणे । तो मुक्त जाहलो तुझेपणे । आता पुसणे सांगणे । दोन्ही नाही ॥१५६३॥
त्या तुझेनि प्रसादे । लाधलेनि आत्मबोधे । उपटले गेले मोहकांदे । भगवंता माझे ॥१५६४॥
टाकूनी त्या द्वैता । पावलो मी अद्वैता । आता सर्वत्र ब्रह्ममयता । भरली भासे ॥१५६५॥
ब्रह्मा विषयी मजठायी । संदेह नुरलाच काही । कर्माचा समूळ अंत पाही । जाहला येथे ॥१५६६॥
तुझ्यासी एकरूप होऊनी । कर्तव्य गेले संपूनी । आता नच काही तुजवाचोनी । भगवंता येथे ॥१५६७॥
द्रष्टा दृश्याचा होऊन अंत । उरली केवळ जाणीव अद्वैत । ते ब्रह्मच असे वसत । सर्वांठायी ॥१५६८॥
जे जाणता बंधन फिटे । जे प्राप्त होता इच्छा सुटे । जे भेटलिया सर्व भेटे । आपोआप ॥१५६९॥
ते ब्रह्म तू गुरुलिंग माझे । जे एकटेच बा विरजे । जयालागी ओलांडिजे । द्वैतपण ॥१५७०॥
आपणचि होऊनि ब्रह्म । सोडावे कृत्याकृत्याचे धाम । मग करणे सेवा निस्सीम । तयाची देवा ॥१५७१॥
गंगासिंधू सेवेस गेली । नि मिळता समुद्र झाली । तैसी भक्ता भेट दिधली । निजपदाची तू ॥१५७२॥
तो तू माझा निरुपचारू । श्रीकृष्णा सेव्य सद्गुरू । केला ब्रह्मतेचा उपकारू । मजवरी देवा ॥१५७३॥
जे मज तुम्हा आड । होते भेदाचे कवाड । देवा द्वैत ते द्वाड । नुरले आता ॥१५७४॥
कर आता आज्ञा । सकळ देवाधिदेव सर्वज्ञा । पाळीन तुझी अनुज्ञा । सर्वकाळ ॥१५७५॥
या अर्जुनाचिये बोले । देव सुखे नाचो लागले । म्हणे विश्वफळा आले । फळ आज ॥१५७६॥
जसा उचंबळे सुधाकर । देखानी आपला कुमार । पहा आत्मभाव क्षीरसागर । विसरेचिना ॥१५७७॥
हा संवाद तो ऐकून । जाणलं दोघांचं एकपण । आणि आले उचंबळून । मन संजयाचे ॥१५७८॥
तेणे उंचबळलेपणे । संजय धृतराष्ट्राते म्हणे । कैसे आम्हासी त्या व्यासाने । उपकृत केले ॥१५७९॥
नाही तुम्हासी नयन । पण ऐकलेत तुम्ही ज्ञान । जयाने होतसे कल्याण । जिवाचे राया ॥१५८०॥
आणि रथाचिये रहाटी । आमची नेमणूक घोड्यासाठी । त्या आम्हा ज्ञान गोष्टी । गोचर झाली ॥१५८१॥
कैसी झुंज भयाण । मांडली येथे दारुण । या युद्धाचं घडणं । विनाशकारी ॥१५८२॥
भरयुद्धाच्या संकटात । अनुग्रह असे वर्षत । मज ब्रह्मानंद तो प्राप्त । जाहला येथे ॥१५८३॥
संजय ऐसे बोलला । पण धृतराष्ट्र उगाच राहिला । चंद्रकिरणांनी शिवतला । दगड जैसा ॥१५८४॥
देखोनी रायाची दशा । संजय करीचना भाषा । मग सुखाने होऊन पिसा । बोलता झाला ॥१५८५॥
भुलविला हर्षवेगे । म्हणोनी धृतराष्ट्रा सांगे । एऱ्हवी नव्हे तयाजोगे । जाणे किर ॥१५८६॥

संजय उवाच

मग म्हणे पै कुरुराजा । ऐसा पुतण्या अर्जुन तुझा । बोलला ते अधोक्षजा । आवडले असे ॥१५८७॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

पूर्व पश्चिम सागर । हा नामाचाच फेर । येर आघवे ते नीर । एक जैसे ॥१५८८॥
कृष्णपार्थ हे दोन । देहभेदाने वेगळे दिसणं । पण दोहोंत भेद असणं । नाही तेथे ॥१५८९॥
जैसे दर्पण ते दोन । समोरासमोर ठेवून । तयांनी एकमेका पाहणं । तैसेच की ॥१५९०॥
तैसा देव देखे पंडुसुत । नि पंडुसुत देवासी देखत । दोघेही होऊनी अनंत । राहिले तेथे ॥१५९१॥
दोघेही ब्रह्म होऊन । एकमेका एकरूप अनुभवून । एकमेकांत गेले विरून । त्या क्षणी ॥१५९२॥
आणिक काहीच नाही । म्हणोनी करिती काई । दोघे एकपणे पाही । नांदताती ॥१५९३॥
जरी भेद तो निर्मून । घडले तेथे संभाषण । तरी तयात ऐक्याचे सुखपण । होतेच तेथे ॥१५९४॥
ऐसे बोलत दुजेपणे । संवादी द्वैत गिळणे । ते ऐकले बोलणे । दोघांचे मिया ॥१५९५॥
स्वच्छ करून दोन आरसे । समोरासमोर ठेवलेसे । कोणकोणा पाहतसे । कल्पावे कैसे ॥१५९६॥
का दीपासन्मुख । ठेवल्यास दुजा दीपक । कोण कोणा प्रकाशक । म्हणावे तेथे ॥१५९७॥
का सूर्यापुढे सूर्यास । समोर ठेवता एकमेकांस । कोण कोणाच्या प्रकाशास । प्राप्त होई ॥१५९८॥
हे जसे ठरवू जाता । ते ठरेच ना बा तत्त्वत: । तैसी ती संभाषणता । शब्दातीत ॥१५९९॥
दोन पाण्याच्या मध्यात । जर उभारली मिठाची भिंत । तर विरून असे जात । तैसे अर्जुना ॥१६००॥
तैसे श्रीकृष्ण अर्जुन दोन्ही । संवादले मज मनी । स्थिती माझीही त्यांच्यावानी । जाहली राया ॥१६०१॥
ऐसे म्हणता संजयाने । गेला भरून सात्त्विकतेने । आणि संजयपणाचे लोपणे । घडले तेथे ॥१६०२॥
तया रोमांच ते उठले । शरीर कंप पावले । नि स्तंभित ते झाले । मन त्याचे ॥१६०३॥
अद्वयानंदस्पर्शे । दिठी रसमय झाली असे । ते अश्रू नव्हते जैसे । द्रवत्वचि ॥१६०४॥
भाव पोटी न मावणे । कंठ तो दाटणे । घडले शब्दांचे आटणे । उसाशापायी ॥१६०५॥
अष्टसात्त्विकता प्रकटून । गेला संजय बावरून । नि पावला एकरूप होऊन । दोघांसी त्या ॥१६०६॥
त्या सुखाची ऐसी जाती । जे आपणचि धरी शांति । मग पुढती देहस्मृति । लाभली तया ॥१६०७॥
घडता आवेगाचे सरणे । म्हणे जे उपनिषद न जाणे । ते मी व्यासकृपेने । ऐकले आज ॥१६०८॥
ऐकताचि ती गोठी । ब्रह्मत्वाची पडली मिठी । मी-तूपणाची सृष्टी । विरोनि गेली ॥१६०९॥
जया म्हणतात योग । पोहचती जेथे सर्व मार्ग । ते ब्रह्ममयतेचे भाग्य । लाभले मला ॥१६१०॥
जे अर्जुनासी सांगणे । तेच मी बा ऐकणे । हे सर्व व्यासकृपेने । घडले आज ॥१६११॥
आज माझे ते कान । गेले पवित्र होऊन । ऐकले अलौकिक ज्ञान । मोक्षदायी ॥१६१२॥
हे म्हणताच संजयाने । घडले तयाचे एकत्व पावणे । जैसे रत्नाचे चमकणे । प्रभेच्याकारण ॥१६१३॥
जशी हिमालयातील सरोवरे । चंद्रोदयी तेथे स्फटिक आकारे । नि सूर्योदयी माघारे । द्रवत्व होय ॥१६१४॥
येता शरीराचे भान । संजया संवाद तो आठवणं । नि पुन्हा देहभान जाणं । घडे तेथे ॥१६१५॥
मग उठोनी म्हणे नृपा । पाहिलेस श्रीहरीच्या विश्वरूपा । तरी उगा का पा । ठाकलासी ॥१६१६॥
जे डोळ्यांनी न दिसे । नाहीपणेंचि जे असे । ते ब्रह्ममयतेचे पिसे । लागले मजसी ॥१६१७॥
पहा घडला चमत्कार । आला ब्रह्ममयतेचा पूर । नि ब्रह्म ते अपार । जाहलो मी ॥१६१८॥
ऐसा तो भाग्यवान । श्रीकृष्णार्जुन संवाद ऐकून । सुटला अहंभावातून । आपोआप ॥१६१९॥
मग तो आनंदात । मनी सद्‌गद होत । श्रीकृष्ण श्रीकृष्ण म्हणत । होता तेथे ॥१६२०॥
या अवस्थेची काही । कल्पना धृतराष्ट्रा नाही । अध्यात्मिक ज्ञान जराही । नव्हते तया ॥१६२१॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

असे सुख ते लाभून । संजय स्वयंभू होऊन । अष्टभावा जिरवून । शांत झाला ॥१६२२॥
अज्ञानाच्या त्या कारण । विचारलं धृतराष्ट्रानं । भलतंच काय हे वागणं । संजया तुझं ॥१६२३॥
तुजला येथे व्यासे । बैसविला कोणत्या उद्देशे । आणि अप्रस्तुत ऐसे । बोलसी काई ॥१६२४॥
जैसे रानातील माणसा त्या । राजवाड्यात ते नेता । वाटते बा भकासता । मनासी त्याच्या ॥१६२५॥
जयाची गोडी नाही समजत । ते बेचवच बा लागतं । म्हणून धृतराष्ट्र तसे बोलत । होता तेथे ॥१६२६॥
अडकून कौरवांच्या मायेत । धृतराष्ट्र होता म्हणत । कोण जिंकेल या युद्धात । सांग मजसी ॥१६२७॥
संजया बा साचे । मनी मानणे आमुचे । पारडे ते दुर्योधनाचे । जडचि असे ॥१६२८॥
पांडवाशी करता तुलना । कौरंवात दीडपटीचा भरणा । म्हणून विजय कौरवांना । शक्य सहज ॥१६२९॥
ऐकलेस तू माझे मत । आता सांग तुझे गणित । काय होईल या युद्धात । आज येथे ॥१६३०॥
या प्रश्ना संजय म्हणे । न जाणे येथे काय होणे । पण जिवाचे ते असणे । अखंड की ॥१६३१॥
चंद्र तेथे चंद्रिका । शंभू तेथे अंबिका । संत तेथे विवेका । पर्याय नाही ॥१६३२॥
राजा तेथे धाक । सौजन्य तेथे सोयरीक । वन्ही तो दाहक । असणे जैसे ॥१६३३॥
दया तेथे धर्म । धर्म ते सुख परम । नि सुख तो पुरुषोत्तम । तैसेच की ॥१६३४॥
वसंत तेथे वने । वन तेथे सुमने । सुमनी भुंग्यांचे असणे । अनिवार्य की ॥१६३५॥
गुरू तेथे ज्ञान । ज्ञानी आत्मदर्शन । दर्शनी समाधान । आधीच असे ॥१६३६॥
भाग्य तेथे विलास । सुख तेथे उल्हास । सूर्य तेथे प्रकाश । तैसेच की ॥१६३७॥
सकळ पुरुषार्था सोबत । राहतो तो अनंत । जैसी लक्ष्मी असे वसत । विष्णू ठायी ॥१६३८॥
आणि आपुलेनि नाथेसी । ती जगदंबा जयापाशी । का न होती दासी । सिद्धी तयाच्या ॥१६३९॥
जेथे असेल तो कृष्ण । तयांनीच विजयी होणं । अटळ हे घडणं । आज येथे ॥१६४०॥
विजय नाम अर्जुनाचे । विजय स्वरूप कृष्णाचे । मग विजयी होणे पांडवांचे । निश्चितच की ॥१६४१॥
त्या देवा एवढी । मायबापे असती तगडी । मग विजयाची घडी । चुकेच ना ॥१६४२॥
तेथील त्या पाषाणांनी । का न व्हावे चिंतामणी । गुण त्या भूमीच्या ठिकाणी । सुवर्णाचे ॥१६४३॥
राजा तेथीच्या गावांत । नदीत अमृत असे वाहत । नवल काही त्यात । नाहीच की ॥१६४४॥
तेथीचे सामान्य शब्द । समजावे ते बा वेद । होऊनी जाणे सच्चिदानंद । कानी पडता ॥१६४५॥
त्या स्वर्ग आणि मोक्षानं । असणे तयाच्या अधीन । जयाचा बाप कृष्ण । जगदीश झाला ॥१६४६॥
जिकडे श्रीकृष्णाचं असणं । तिकडेच सर्व सिद्धींचे प्रकटन । मग पांडवांचं विजयी होणं । टळे कैचे ॥१६४७॥
समुद्रातून मेघ उपजला । तो समुद्रापेक्षाही चांगला । प्रकार कृष्णार्जुनाचा त्यातला । दिसे येथे ॥१६४८॥
करे लोहा सुवर्ण थेट । म्हणून परीस सुवर्णाहून श्रेष्ठ ।पण उपयोगी व्यवहारात । सोनेच की ॥१६४९॥
येथे गुरुत्वा येतसे उणे । ऐसे जन कोणी म्हणे । नाही का वन्ही दीपपणे । उपयोगी जास्त ॥१६५०॥
तैसे देवाच्या शक्तिकारण । अर्जुन देवाहून सामर्थ्यवान । तो देवाचाच गौरव असणं । तैसेच की ॥१६५१॥
व्हावे वाटते बापास । पुत्राने आपल्याहून सरस । तैसेच वाटत असावे कृष्णास । आज येथे ॥१६५२॥
त्या कृष्णकृपेकारण । जिकडे असे तो अर्जुन । त्यांचाच विजय होणं । अनिवार्य की ॥१६५३॥
मजसी खात्री अपार । आज अर्जुनच जिंकणार । अन्यथा निरर्थकच ठरणार । नाव विजयाचे ॥१६५४॥
जिकडे असणे अर्जुन । तयांनीच विजयी होणं । तयांचाच उत्कर्ष होणं । साहजिक की ॥१६५५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जर माझे मत ऐकाल। आणि व्यासांवर विश्वास असेल। तर वचन माझे अढळ। समजावे तुम्ही ॥१६५६॥
जेथे तो श्रीवल्लभ। तेथेच ऐश्वर्याचे भोग। असती सुख आणि लाभ। तेथे राया ॥१६५७॥
ऐसे जर न होईन। तर व्यासांचे नांव न सांगेन। अशी प्रतिज्ञा करून। उभारले बाहू ॥१६५८॥
सर्व वेदांचा आवाका। आणुनी श्लोका एका। संजयाने कुरुनायका। दिधला हाती ॥१६५९॥
अग्नीचा विस्तार अपार। पण घालवण्या तो अंधार। करणे पणतीचा वापर। तैसेच की ॥१६६०॥
जरी शब्दब्रह्म अनंत। झाले सव्वालक्ष ते वेदात। नि बनले शतक सात। गीतेमाजी ॥१६६१॥
ब्रह्मज्ञान ते अपार। हा व्यासांचा उद्‌गार। म्हणून सातशे श्लोकांचा सार। गीतेअंती ॥१६६२॥
हा एकच श्लोक जरी। राया हृदयात घर करी। तरी अविद्येची बारी। संपूनी जाये ॥१६६३॥
ऐसे श्लोक शते सात। गीतेची पदे अंगे वाहत। पद नसे ते परमामृत। ब्रह्मीचे राया ॥१६६४॥
आत्मतत्त्वाच्या सभेत। गीता असे ती डोलत। असे मोक्षज्ञान सांगत। जगा माजी ॥१६६५॥
गीता ही सप्तशती। मोक्षदायी भगवती। मोह मायेची ती मुक्ती। गीतेकारणे ॥१६६६॥
म्हणोनी मन काये वाचा। जो सेवक होईल तियेचा। तो स्वानंद साम्राज्याचा। धनी होई ॥१६६७॥
अविद्या अंधार संपवून। जयाने ब्रह्मासही जिंकणं। ऐसे विलक्षण ज्ञान। प्रकटले येथे ॥१६६८॥
गीता ही अनमोल। जसा द्राक्षाचा वेल। सकळ विश्रांती भेटेल। सर्वांना येथे ॥१६६९॥
होण्या जगाचे कल्याण। जे सांगितलं भगवंतानं। तेच हे अध्यात्मज्ञान। मोक्षदायी ॥१६७०॥
मोक्षाची महिमा गाऊन। मोक्ष मार्ग सांगणं। मोक्षाचे ते प्रकटन। गीतेमाजी ॥१६७१॥
करून श्लोकांचे आवार। जे सात शते सुंदर। वसवले ते गीतापूर। भगवंताने ॥१६७२॥
होण्या ते आत्मज्ञान। गीता सांगणं भगवंतानं। पहा किती करुणावान। भगवंत आहे ॥१६७३॥
हे गीताकमळीचे भृंग। हे गीतासागरतरंग। जसे रथाचे हे तुरंग। श्लोक असती ॥१६७४॥
सर्वज्ञानाचा संघात। आहे गीतेच्या आत। परब्रह्माची ती बात। गीतेमाजी ॥१६७५॥
ही नव्हे श्लोकांची पंक्ती। चित्ता येण्या ती विरक्ती। सांगितली ज्ञानाची युक्ती। गीतेठायी ॥१६७६॥
एकाहून एक सरस। श्लोक राया हे खास। तयांच्या त्या वर्णनास। नसे तोड ॥१६७७॥
जसे कामधेनू संबंधात। लहान मोठी ही बात। ती करताच नाही येत। तैसेच की ॥१६७८॥
प्रकाशा पुढील मागील। सूर्या धाकटा वडील। सागरा उथळ खोल। म्हणावे कैसे ॥१६७९॥
श्लोक शेवटचे पहिले। नाही डावे उजवे झाले। पारिजाताची ती फुले। समान जैसी ॥१६८०॥
गीतेच्या त्या ठिकाणे। नाही काहीच उणे। श्लोकात भेद मानणे। योग्य नाही ॥१६८१॥
या गीतेच्या शास्त्रात। अद्वैत आहे वसत। ज्ञानी असती जाणत। जयासी अंतरी ॥१६८२॥
लाभते जे अर्थ जाणून। तेच लाभे नुसत्या पाठानं। ब्रह्मचि होऊन जाणं। वाचता गीता ॥१६८३॥
करू स्तुति किती गीतेची। किल्लीच जी मोक्षाची। जाणीव ती मूर्ती प्रभूची। गीता असे ॥१६८४॥
शास्त्रांचा अर्थ कळता। राया मन जाते अस्ता। तैसीच ही गीता। परब्रह्म जे ॥१६८५॥
कैसी भगवंताची कृपा। केला मोक्ष मार्ग सोपा। अर्जुनाचे नि रुपा। दाविला देवे ॥१६८६॥
जसे त्या चंद्राने। निववीली तिन्ही भुवने। चकोराच्या निमित्ताने। तैसेच की ॥१६८७॥
का गौतमाचेनि मिषे। काळ संपविण्या उद्देशे। गंगेचा ओघ गिरीशे। पृथ्वीसी आणिला ॥१६८८॥
तैसे निमित्त करून पार्थाते। वाटले जगात पुरते। गीतेचे हे दुभते। देवाने येथे ॥१६८९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

येथे जो बुडी मारेल । तो ब्रह्मचि बा होईल । गीता जो वाचेल । ज्ञान तया ॥१६९०॥
परिसाचा स्पर्श होणं । मग लोहचि बने सुवर्ण । तैसे ब्रह्ममयतेचे प्रकटन । गीतेमाजी ॥१६९१॥
गीता पाठाची वाटी । लावता राया ओठी । ब्रह्ममयतेची पुष्टी । येई अंगी ॥१६९२॥
करूनी मुख वाकडे । जर व्हाल तुम्ही कानोडे । तरी कानाही घेता पडे । मोक्ष पदरी ॥१६९३॥
श्रवण पठण अर्थग्रहण । काहीही राया घडणं । तरी मोक्षाचं ते भेटणं । टळेचि ना ॥१६९४॥
म्हणून जाणत्याच्या संगतीने । गीतचे राया अभ्यासणे । मग इच्छांचे ते संपणे । आपोआप ॥१६९५॥
संवाद श्रीकृष्णार्जुनातील । तो मोक्षच बा भेटवील । अलौकिक ज्ञान रचलं । व्यासांनी राया ॥१६९६॥
जशी माय बालकास । खाऊ घालते घास । तैसीच कृपाखास । गीतेमाजी ॥१६९७॥
वायू तो अफाट असणं । पण पंख्याने वारा घेणं । ते बुद्धिमंताचे लक्षण । निर्विवाद की ॥१६९८॥
शब्दी जे न लाभते । रचुनी अनुष्टुभ छंदाते । स्त्रीशूद्रा सकट ते । वाटले व्यासांनी ॥१६९९॥
स्वातीच्या त्या पाण्यानं । जर न झाले मोती प्रकटन । तर स्त्रिया त्या खुलून । दिसतील कां ॥१७००॥
जर नाद न झाला उत्पन्न । मग कानांनी ऐकावं कोठून । न होता फुलांचं प्रकटन । वास कैसा ॥१७०१॥
गोड न होती पक्वान्ने । तरी का आवडती रसने । न दर्पणावीण नयने । दिसे नयन ॥१७०२॥
जर नसती ब्रह्ममयता ती । तर कैसी बा आकळती । मग वायाच श्रीगुरुमूर्ती । गेली की ॥१७०३॥
ज्ञान जे असंख्यात । जर न प्रकटते सातशे श्लोकांत । तर कोणा होते फावत । आज येथे ॥१७०४॥
मेघ सागराचे पाणी वाहे । परि सागरी उणीव नोहे । जे काही अनंत आहे । न दिसे कोणा ॥१७०५॥
आणि वाचा जे न पवे । ते हे श्लोक न होते बरवे । तरी काने मुखे फावे । घडते का कधी ॥१७०६॥
म्हणून श्रीव्यासांचा हा थोर । विश्वा जाहला उपकार । जो श्रीकृष्णोक्ती आकार । ग्रंथ गीता ॥१७०७॥
आणि तोच मी आता । गीतेचे श्लोक आकळता । आणला बा श्रवणपथा । मराठीत ॥१७०८॥
मन व्यासादिकांचे ते । जेथे साशंक होते । स्पष्ट करून ते । सोपे केले ॥१७०९॥
आहे ईश्वर तो भोळा । ल्याला व्यासोक्ती कुसुममाळा । तरी माझीया दुर्वादळा । नाकारेच ना ॥१७१०॥
क्षीरसिंधुचिया तटा । पाणिया येती गजघटा । तेथे काय चिलटा । बंदी असे ॥१७११॥
नुकतेच पंख येऊन । पाखराच्या पिलाचं उडणं । तेथे गरुडाचेही उड्डाण । चालेच की ॥१७१२॥
अप्रतिम त्या ऐटीने । चाले राजहंसाचे चालणे । म्हणून काय दुज्याने । चालूच नये ॥१७१३॥
मोठ्या आकाराकारण । कलशात पाणी खूप मावणं । तरी चुळीने चूळभर पाणी घेणं । टळले का कधी ॥१७१४॥
दिवटीच्या अंगी थोरी । म्हणून बहुतेज ती धरी । पण वात आपुलियापरी । प्रकाशेच की ॥१७१५॥
प्रतिबिंब त्या समुद्रात । आकाशाचं पडलेलं असतं । आणि लहान त्या डबक्यात । आकाशच की ॥१७१६॥
व्यासादिकांसारख्याने । ब्रह्ममयता सांगणे । म्हणून आम्हास बंदी घालणे । योग्य नाही ॥१७१७॥
जलचरे त्या समुद्रात । पर्वताएवढी राहतात । तरी मासोळीही असे विचरत । समुद्रीच की ॥१७१८॥
राहे जवळ अरुण । म्हणून सूर्या तयाने पाहणं । पण पृथ्वीवरुन मुंगीचं देखणं । न जाते वाया ॥१७१९॥
म्हणून आमच्यासारख्यानं । न सांगावे देशी भाषेत ज्ञान । अनुचित हे म्हणणं । सर्वकाळ ॥१७२०॥
बाप पुढे चालला । नि पुत्र मागुती गेला । मग नक्कीच तो पोहचला । इच्छित स्थळी ॥१७२१॥
तैसा व्यासांचा मागोवा घेत । भाष्यकारा वाट पुसत । मी अयोग्य जरी असत । पोहचेन तेथे ॥१७२२॥
मग अनंत क्षमावान । नि अपार प्रज्ञावान । ऐसे ते ब्रह्मपण । प्रकटते अंतरी ॥१७२३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जयाचेनि ते अंशे । सूर्य अंधारा नाशे । ते ब्रह्म आपैसे । अनुभवा येई ॥१७२४॥
समुद्री जयाचे तोय । तोया जयाचे माधुर्य । माधुर्या सौंदर्य । जयाचेनि ॥१७२५॥
पवना जयाचे बळ । आभाळाचे जे आभाळ । ज्ञान जाहले उजळ । तेणे की ॥१७२६॥
वेद जेणे सुभाष । सुख जेणे उल्हास । विश्व येई बा रुपास । जयाचे कारणे ॥१७२७॥
तो सर्वोपकारी समर्थु । सद्‌गुरू श्री निवृत्तिनाथु । विराजत असे मज आंतु । रिघोनिया ॥१७२८॥
ऐसे ते आत्मतत्त्व । मी वर्णिले मराठी ओवीत । आश्चर्य काय त्यात । कृपा होता ॥१७२९॥
जयापासी केवळ माती । केली श्रीगुरूंची मूर्ती । त्या एकलव्याची कीर्ती । विश्वी आहे ॥१७३०॥
चंदने वेढली झाडे । झाली चंदनाचेनि पाडे । तैसी ब्रह्ममयता वाढे । श्रीगुरू संगे ॥१७३१॥
माझ्या त्या अंतरात । श्रीगुरू असे राहत । तेणेच मी ब्रह्ममयतेत । खेळतू असे ॥१७३२॥
आधीच देखणी दिठी । वरी सूर्य उभा पाठी । तर न दिसे ऐसी गोठी । आहे कोठे ॥१७३३॥
म्हणोनी माझे नित्य नवे । श्वासोच्छ्‌वासही ग्रंथ व्हावे । गुरूकृपे काय नोहे । घडे येथे ॥१७३४॥
त्या गुरूकृपेच्याचकारण । गीतार्थ मराठी ओवी होऊन । सहज सोपा विस्तारून । गेला येथे ॥१७३५॥
मराठीतली ही गीता । नि अर्थ तिचा आकळता । गाण्यात अति अलौकिकता । आहे येथे ॥१७३६॥
म्हणून गीता गाऊ जाता । ओवीत अतिसुंदरता । नि आकळता ब्रह्ममयता । सोपीच की ॥१७३७॥
अंगावर न घालता । दागिन्याठायी सुंदरता । मग अंगावर चढवता । वाढे शोभा ॥१७३८॥
जशी मोतियाची बात । सोन्यासंगे असे खुलत । आणि सोन्यावीणही असे असत । सुंदरच की ॥१७३९॥
वसंतातील ती फुले । सुटे वा गुंफलेले । कधी का कमी भरले । सुवासात ॥१७४०॥
तैसे स्वरबद्ध होऊन । झाले ओवीचे प्रकटन । आता अध्यात्म आकलन । सोपे अति ॥१७४१॥
त्या ओवीच्या कारण । आता ज्ञान सर्वांना समजेन । ब्रह्ममयता ती प्रकटेन । शब्दांकरवी ॥१७४२॥
जसा तरू चंदनाचा । न शोध घ्यावा लागे फुलोऱ्याचा । तैसे आस्वाद ब्रह्ममयतेचा । सहज येथे ॥१७४३॥
तैसे या ग्रंथाचे श्रवणी । ऐकताक्षणी समाधी आणि । ब्रह्म जाई आकळुनी । क्षणार्धात ॥१७४४॥
हा ग्रंथ पाठ करणे । ते सोन्यात हिरे बसवणे । मग अमृताही डावलणे । घडे तेथे ॥१७४५॥
ऐसे आयतेपणे । ज्ञान प्रकटले ओवीपणे । मग ब्रह्म ते आकळणे । अनिवार्य की ॥१७४६॥
ब्रह्ममयतेची अनुभूती । येईल बा सर्वांप्रति । ऐसी भावार्थाची महती । ओवीत आहे ॥१७४७॥
आपल्या त्या तळमळीकारणे । चकोरा चंद्र प्राप्त होणे । पण चंद्र उपलब्ध असणे । सर्वांसाठी ॥१७४८॥
जयाने अंतरंगी बुडी मारणं । तयासीच होते ज्ञान । आणि केवळ वाचन श्रवण । सुख देई ॥१७४९॥
ऐसे श्री निवृत्तिनाथाचे । गौरव आहे जी साचे । ग्रंथ नव्हे गुरुकृपेचे । वैभव की ॥१७५०॥
शिवाने क्षीरसिंधू परिसरात । कथिले उमेच्या कानात । ते ज्ञान या ग्रंथात । भरले आहे ॥१७५१॥
त्या समुद्राच्या लाटात । मच्छिंद्र मगरीच्या पोटात । तयाच्याही कानात । पडले ज्ञान ॥१७५२॥
तो मच्छिंद्र सप्तशृंगी । भेटला भग्नावयवी चौरंगी । जाहला तो सर्वांगी । परिपूर्ण मग ॥१७५३॥
समाधी ज्ञानास या । मच्छिंद्रे दिधले गोरक्षराया । गोरक्षे मग गहिनीया । दिधले पुढे ॥१७५४॥
त्या ज्ञानाच्याकारण । घडे मनइंद्रिया ओलांडणं । मग ब्रह्माची ती जाण । अंतरी येई ॥१७५५॥
तर्क बुद्धि सांडून । मन संपूर्ण निरसणं । तेव्हाच ती खूण । येतसे हाता ॥१७५६॥
ग्रासले भुता काळाने । जाणून हे गहिनीने । ज्ञान श्रीनिवृत्तीस देणे । आले पुढे ॥१७५७॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे आदिशंकरापासून। आले शिष्यपरंपरेनं। म्हणून आम्हा ब्रह्मज्ञान। लाभले येथे ॥१७५८॥
आता कळीकाळ संपून। सर्वांना ज्ञान होईन। विश्वच ब्रह्म बनून। जाईल आता ॥१७५९॥
श्रीगुरू गरिबांचा वाली। तया अंतरी करुणा प्रकटली। म्हणून प्रचंड वर्षा झाली। ज्ञानाची येथे ॥१७६०॥
ऐसा श्रीगुरू पान्हावला। नि शांतरसे वर्षला। म्हणून भावार्थ हा प्रकटला। अंतरी माझ्या ॥१७६१॥
श्रीगुरूच्याचकारण। प्रकटले हे ज्ञान। संपले जिवाचे जीवपण। श्रीगुरूकारणे ॥१७६२॥
ऐसे गुरूपरंपरे लाभले। समाधिधन जे आपुले। ते भावार्थरुपे दिधले। गुरूने मजसी ॥१७६३॥
न आवड पढण्या वाचण्याची। न जाणे सेवा गुरूची। ऐशा मज ग्रंथाची। योग्यता कैसी ॥१७६४॥
परि साचचि गुरुनाथे। निमित्त करून माते। या ग्रंथाकारणे जगाते। उद्धरीले जाणा ॥१७६५॥
त्या पुरोहिताप्रमाणे। मी बोलले पुरे उणे। ते तुम्ही मातेप्रमाणे। करावे सहन ॥१७६६॥
शब्द कैसा घडावा। सिद्धांत कैसा बांधावा। अलंकार कैसा घालावा। न जाणे मी ॥१७६७॥
जसे सूत्रधाराच्या तंत्राने। बाहुलीने हालचाल करणे। तैसा श्रीगुरूकारणे। बोललो मी ॥१७६८॥
तसे या ग्रंथात। दोष नसतीच बा वसत। कारण श्रीगुरूंची साक्षात। वाणी ही ॥१७६९॥
आणि जर काही। ग्रंथी उणीव राही। पूर्ण करावी बा तुम्ही। ज्ञानी जन ॥१७७०॥
परिसाचा स्पर्श होऊन। जर लोह सुवर्ण न होणं। मग दोष कोणाचा असणं। सांगा तुम्ही ॥१७७१॥
ओढयाने इतकेच करावे। गंगेसी जाऊन मिळावे। मग गंगाची होऊन जावे। तैसेच की ॥१७७२॥
तैसे भाग्याचे कारण। आलो तुम्हासी शरण। आता मजसी काय उणं। जगी आहे ॥१७७३॥
त्या माझ्या गुरुराजानं। दिली तुमची भेट घालून। म्हणून मनोरथ पूर्ण। झाले माझे ॥१७७४॥
माहेरी ती येता। अनायासे लाभे तृप्तता। तैसी ग्रंथाची परिपूर्णता। तुम्हाकारणे ॥१७७५॥
जी सोन्याचे निखळ। करता येईल भूमंडळ। पर्वत चिंतामणीचा अचळ। शक्य आहे ॥१७७६॥
सातीही समुद्र भरणे। शक्य त्या अमृताने। नक्षत्रांचे चंद्र होणे। अशक्य नाही ॥१७७७॥
कल्पतरूंचे उद्यान। शक्य लावता येणं। पण वर्म गीतेचे जाणणं। कठीण आहे ॥१७७८॥
<u>मी मुकाच असे असत। पण सोप्या मराठी ओवीत। सर्वांना असे समजावत। ब्रह्मज्ञान</u> ॥१७७९॥
हा ग्रंथ सागरा एवढा। आपैसा तुटे भवकडा। मग ब्रह्ममयतेचा झेंडा। लागोनी जाये ॥१७८०॥
उभारुन गीतार्थाचे आवार। प्रकटले ब्रह्मज्ञानाचे मंदिर। श्रीगुरूंचे ते उपकार।मजवरी झाले ॥१७८१॥
मातेपासून जे हरवले। ते पुन्हा मातेसी भेटले। तैसे पहा प्रकटले। ज्ञान आज ॥१७८२॥
तुमच्या पुण्यकर्माकारण। प्रकटले बा ब्रह्मज्ञान। गोष्ट घडली महान। आज येथे ॥१७८३॥
तुमच्याच बा कारण। झालं ग्रंथाचं सांगणं। जन्म सफल होऊन। गेला माझा ॥१७८४॥
धरून तुमचा भरवसा। होती केली मी आशा। म्हणून ग्रंथ गीतेसरीसा। वर्णिला आज ॥१७८५॥
मजकडून बा तुम्ही। ग्रंथ जो प्रकटविला स्वामी। पाहोनी हासो आम्ही। विश्वामित्रासही ॥१७८६॥
त्रिशंकूचा धरून अभिमान। आणावया ब्रह्मासी कमीपण। करणे अनित्य सृष्टी निर्माण। पुरुषार्थ नाही ॥१७८७॥
शंकराने उपमन्यूच्या मोहात। क्षीरसागर आणिला अस्तित्वात। पण विष त्या सागरात। आहेच की ॥१७८८॥
घालवण्या तो अंधार। धावुनी येतो बा प्रभाकर। पण चराचरा उष्णता प्रखर। सहावी लागे ॥१७८९॥
विश्वासी त्या निववीत। चंद्र चांदणे असे ओतीत। पण आधीच तो कलंकित। ठरला असे ॥१७९०॥
आज तुम्ही संतांनी। ग्रंथ अलौकिक निर्मुनी। मोक्षबीजांची पेरणी। केली आहे ॥१७९१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

बा तुमच्याचकारण । सिद्धीस गेले धर्मकीर्तन । आणि ते उरले सेवकपण । माझे ठायी ॥१७९२॥
आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे । तोषोनी मज द्यावे । पसायदान ॥१७९३॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परे पडो । मैत्र जिवाचे ॥१७९४॥
दुरितांचे तिमीर जावो । विश्व स्वधर्मसूर्य पाहो । जो जे वांछील तो ते लाहो । प्राणीजात ॥१७९५॥
वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटो तया भूतां ॥१७९६॥
चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गाव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥१७९७॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥१७९८॥
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊन तिन्ही लोकी । भजिजो आदिपुरूखी । अखंडित ॥१७९९॥
आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकी इये । दृष्टादृष्ट विजये । होआवो जी ॥१८००॥
तेथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो । येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥१८०१॥
ऐसे कलियुगात । पवित्र महाराष्ट्र देशात । ओवी गोदातीरी मराठीत । प्रकटली आज ॥१८०२॥
त्या गोदावरीच्या तीरी । श्रीरामाची ओसरी । म्हणून ब्रह्मज्ञान भारी । प्रकटले येथे ॥१८०३॥
येथे त्या पंचवटीत । राम होता राहत । म्हणून ब्रह्म असे नांदत । गोदातीरी ॥१८०४॥
अनादि शिवपरंपरेत । प्रकटले श्रीनिवृत्तिनाथ । म्हणून गीता ओवीत । जाहली बद्ध ॥१८०५॥
ऐसा त्या महाभारतात । भीष्मनाम पर्वात । संवाद श्रीकृष्णार्जुनात । जाहला सिद्ध ॥१८०६॥
ते उपनिषदांचे सार । सर्व शास्त्रांचे माहेर । ज्ञानी जे सरोवर । सेविती सदा ॥१८०७॥
तो हा गीतेचा कलश । संपूर्ण जो अष्टादश । म्हणे निवृत्तीचा दास । ज्ञानदेवो ॥१८०८॥
पुढती पुढती पुढती । ही ग्रंथपुण्यसंपत्ती । सर्वांसी ब्रह्मानुभूती । देईल अखंड ॥१८०९॥
शके बाराशते बारोत्तरे । तै टीका केली ज्ञानेश्वरे । सच्चिदानंदबाबा आदरे । लेखकु झाला ॥१८१०॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षसंन्यासयोगोनाम अष्टादशोऽध्याय: ॥१८॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधु नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान ®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०